ई निविदा सूचना क्र. 1 सन 2026-27

# देवगड जामसंडे नगरपंचायत

## ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

## निविदा फॉर्म

कामाचे नांव :- मुख्याधिकारी, देवगड-जामसंडे नगरपंचायत यांच्या वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदार / संस्था / एजन्सीकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा बयाणा किंमत :- रु. 50,000/ -

निविदा दस्त ऐवजाची किंमत :- रु. 2000/ -

निविदा कालावधी :- 1 वर्ष

# देवगड जामसंडे नगरपंचायत
## ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

देवगड जामसंडे नगरपंचायत ता. देवगड जि. सिंधुदुर्ग ई-निविदा सुचना क्र.1/कार्या.भांडार विभाग/1214 /2026 दिनांक :-14/05 /2026 मुख्याधिकारी, देवगड जामसंडे नगरपंचायत यांचे वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदार / संस्था / एजन्सीकडून खालील कामाकरीता गुणवत्ता निकष ई-निविदा प्रणालीद्वारे मागविणेत येत आहे. ई- निविदा फॉर्म http://mahatenders.gov.in या पोर्टलवरुन डाऊनलोड केला जाऊ शकतो.

| अ.क्र | कामाचे नाव | अनामत रक्कम रूपये | कामाचा कालावधी | निविदा संचाची किंमत रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | भंगार साहित्य लिलाव प्रक्रिया | 50,000/- | 1 वर्ष | 2,000/- |

| अ.क्र | निविदा वेळापत्रक | दिनांक आणि वेळ पासुन |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन निविदा प्रकाशन तारीख | दि. 15 /05/2026 सकाळी 11.00 वाजता |
| 2 | ऑनलाईन अनामत रक्कम व निविदा फॉर्म रक्कम आणि साक्षांकित कागदपत्रे सिलबंद लिफाफा प्रत सादर करणे. | दि.29/05/2026 दुपारी 2.00 वा.पर्यंत |
| 3 | ऑनलाईन निविदा अपलोड करणे | दि.29/05/2026 दुपारी 2.00 वा.पर्यंत |
| 4 | ऑनलाईन निविदा उघडण्याची तारीख (शक्य असल्यास) | दि.30 /05/2026 दुपारी 2.00 वाजता |

**कामाचे स्थळः** देवगड जामसंडे नगरपंचायत कार्यक्षेत्र.

***अटी व शर्ती-***

1. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून दाखल करता येईल. निविदा संबंधी माहिती व अटी शर्ती संकेत स्थळावर पहावयास मिळतील.
2. बयाणा भरावयाची रक्कम ही फक्त ऑनलाईन भुगतान पद्धतीनेच स्विकारल्या जाईल. रोख, चेक किंवा डी.डी. च्या स्वरुपात घेतल्या जाणार नाही.
3. ई-निविदा कोणत्याही वेळी कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्याचे अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवलेला आहे.
4. कामाचा करारनामा करणे मंजूर ठेकेदारास कामाचा आदेश देणेकरिता नगरपंचायतीकडील विहित नमुन्यात नियमानुसार रक्कम रु.500/- स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

**टीप :-** मुख्याधिकारी, देवगड जामसंडे नगरपंचायत यांना कोणतेही कारण न देता, निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सबमिशन कालावधीत मुदतवाढ देण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.

Patil

मुख्याधिकारी
देवगड जामसंडे नगरपंचायत

❖ **ई-निविदा / लिफाफा पध्दतीसाठी माहीती पत्रक व सामान्य अटी**

1. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पात्र/ इच्छुक निविदा धारकांना स्वत: www.mahatenders.gov.in या पोर्टलवर नोंदणी करावी.
2. निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन निविदेची वैधता 45 दिवस असेल. अपुर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी,देवगड जामसंडे नगरपंचायत यांनी राखुन ठेवला आहे.
3. निविदा प्रपत्राची किंमत व बयाणा रक्कम ही निविदा अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन जमा केलेली असावी. बयाणा रक्कम अयशस्वी निविदा धारकास निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.
4. या निविदेमध्ये नमुद सर्व अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या निविदाधारकाने जर निविदा ऑनलाईन पोर्टलवर नमूद केलेल्या वेळेपेक्षा उशिरा सादर केल्यास त्या स्विकारल्या जाणार नाही.
5. अपूर्ण निविदा जी कोणत्याही अटी पूर्ण करीत नाही ते नाकारण्यास पात्र आहेत.
6. निविदेसोबत सादर केलेले दर हे स्पष्टपणे शब्दांत आणि आकडेवारीत उल्लेखित केले असले पाहिजेत.
7. या निविदेमध्ये नमुद तसेच कामाच्या करारनाम्यात नमूद केलेल्या इतर सर्व अटी आणि शर्ती कंत्राटदारास बंधनकारक असतील व तो सदर निविदेचा भाग असेल.
8. निविदा सादर करणे व निविदा प्रक्रीयेत सहभाग घेण्याकरीता लागणारा संबंधित सर्व खर्च करण्याची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.
9. कार्यादेश मिळालेल्या निविदा धारकाला हे काम स्वतः करणे बंधनकारक राहील. कोणत्याही इतर एजन्सी अथवा इतर कंत्राटदाराकडुन निविदेतील नमुद कामे करुन घेता येणार नाही.
10. निविदेतील नमुद कामामध्ये पूरवठा बदल करण्याचे सर्व अधिकार मुख्याधिकारी देवगड जामसंडे नगरपंचायत यांनी राखून ठेवलेले आहे.
11. कामाची मुदत वाढविण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. तसेच वरील निविदेच्या कामाशी संबंधित कोणताही वाद, त्रुटी इ .निर्माण झाल्यास मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
12. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील स्थायी निदेश मधील संविदा विषयक तरतुदी तसेच योजनेच्या कामा संदर्भात शासनाकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सूचना, निर्देश यांचे पालन करणेची जबाबदारी मक्तेदार यांच्यावर राहील.
13. सदरील कामाची पूर्तता करीत असताना काही कारणास्तव सदरचे काम करणेचे नाकारल्यास अगर मुदतीत सदरील कामाची पूर्तता करून न झालेस दुसऱ्या ठेकेदाराकडून वरील शर्तीस अनुसरून कामाची पूर्तता करून घेतलेस त्या कामी नफा झाल्यास तो मी मागणार नाही व नुकसान झाल्यास ते नुकसान भरून देईन. तसेच नगरपंचायतीकडे जमा असलेली डीपॉझीट, बयाणा रकमेवर मक्तेदार यांचा कोणताही हक्क राहणार नाही.

14. काम करत असताना चुकीमुळे, हलगर्जीपणामुळे अपघात, जीवित अथवा वित्त हानी झालेस किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेस त्याची जबाबदारी मक्तेदार यांची राहील.

15. याकामी बाल कामगार नियुक्त करता येणार नाही तसे आढळल्यास प्रचलित कायद्यानुसार कंत्राटदार कारवाईस पात्र राहील.

16. सदर कामाबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास याबाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील. सदर मंजूर कामावरील सर्व जबाबदाऱ्या कंत्राटदार यांचेवर राहतील. याबात कोणतीही तोषीस नगरपंचायतीस लागू राहणार नाही.

17. निविदेचा वैध कालावधीमध्ये नगरपंचायत संमती शिवाय मक्तेदाराने निविदा रद्द केल्यास किंवा करारातील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास त्यांची भरलेली सुरक्षा/अनामत नगरपंचायतीकडून जप्त करणेत येईल.

18. करारपत्रातील अटी व शर्तीमध्ये नगरपंचायतीच्या हिताच्या दृष्टीने बदल / वाढ करण्याचे अधिकार नगरपंचायतीकडे राहतील.

19. मा. शासनाचे प्रचलित नियमानुसार भरावे लागणारे आवश्यक ते सर्व कर मुदतीत भरणेची जबाबदारी कंत्राटदार / संस्था / एजन्सी यांच्यावर राहील.

20. कंत्राटदारास रक्कम स्विकारताना आयकर लागू असलेस वस्तू व सेवा कर (GST) नियमाप्रमाणे वसुल करणेत येईल.

21. निविदेच्या कामाच्या संबंधीत कोणताही वाद निर्माण झालेस मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

22. या विभागातील निर्देशित केलेले भंगार व इतर वस्तू निविदा पद्धतीने जेथे आहे व जसे आहे तसे विक्री करणे आहे.

23. सदर उपकरणे भंगार असून त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही संबंधित निविदाधारकाची राहील यापासून पर्यावरणाला हानी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

24. साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करून त्याबाबतचे खरेदी करावयाचे निविदेचे दर निविदा फॉर्ममध्ये नमूद करून सादर करणे आवश्यक आहे कोणत्याही परिस्थितीत सदर दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

25. भंगार साहित्यामधील पंप, मोटर व ट्रान्सफॉर्मर व इतर उपकरणांमधील तांबे, पितळ ठेकेदार यांनी स्वखर्चाने काढून घेणे.

26. आदेश मिळाल्यानंतर तीन दिवसात साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रकमेस मुकावे लागेल.

27. यशस्वी निविदा धारकास सदर वस्तू वाहतूक करताना / ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क कराचा भरणा अनुषंगिक खर्चाची संपूर्ण जबाबदारी सदर निविदा धारकाची राहील.

28. यशस्वी निविदा धारकाने निविदा मंजुरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्यांनी जमा केलेली अनामत रक्कम जप्त करून नगरपंचायतीस जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

29. निविदेबाबत निविदा धारकाची कोणतीही अट स्वीकारली जाणार नाही.

30. यशस्वी निविदा धारकाने वस्तू ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास मालमत्तेच्या नुकसान भरपाईची किंमत द्यावी लागेल .

31. निविदा भरण्यापूर्वी निविदा धारकाने स्वत: प्रत्यक्ष काम चालू असलेल्या ठिकाणी निर्लेखित वस्तू/मालाची पाहणी करावी. नंतर मालाच्या दर्जाबाबत किंवा वजनाबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

32. साहित्य उचलताना मजुराचा अपघात किंवा वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

33. निविदा दर मंजूर झाल्यानंतर त्या कंत्राटदाराची अनामत रक्कम लेखापरीक्षण होईपर्यंत नगरपंचायतीकडे जमा राहील लेखापरीक्षणानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

34. निविदा मंजूर झाल्याचे पत्र मिळाल्यापासून 7 दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम तसेच लागू असलेला जीएसटी (GST) टीसीएस (TCS) आणि इतर स्थानिक कर निविदा धारकाला भरणा करावे लागेल. रक्कम पूर्ण भरणा केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत तीन दिवसाच्या आत सदरचे भंगार साहित्य ताब्यात घेण्याची जबाबदारी संबंधित मक्तेदार/निविदाधारकाची राहिल.

35. सदर भंगार निविदा ही पाणीपुरवठा योजना दुरुस्ती कामांतर्गत निविदा दिनांकापर्यंत प्राप्त झालेले भंगार साहित्य तसेच उर्वरित दुरुस्ती काम पूर्ण झाल्यानंतर त्यातून प्राप्त होणारे भंगार साहित्य यांस लागू राहील.

36. सदर भंगार निविदा ही संबंधित काम पूर्ण होईपर्यंत लागू राहील, निविदाधारकाने सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची भाववाढ अथवा दरवाढ मान्य केली जाणार नाही.

❖ **पात्रता निकष :**

संदर्भांकित कामासाठी निविदा धारकांकरिता खालील प्रमाणे पात्रता निकष व दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे. निविदा धारक संस्था, कंपनी यांची कायद्यानुसार आस्थापनेची नोंदणी असणे आवश्यक आहे.

1. **नोंदणी** :- या निविदा प्रक्रीयेत सहभाग घेणारे मालक कंपनी, भागीदारी फर्म, लिमिटेड पार्टनरशिप फर्म, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी किंवा पब्लिक लिमिटेड कंपनी असू शकतात आणि याला पाठिंबा देण्यासाठी बोली लावणाऱ्यांनी शासनाचे अथवा शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणाकडे केलेली नोंदणी प्रत सादर करावी. एकच संस्था ही बोली लावण्यास पात्र आहे. (Registration certificate of Shop Act license)

2. मागील तीन वर्षाचा आयकर भरण्याचे प्रमाणपत्र

3. जी.एस.टी.प्रमाणपत्र. (Goods & Service Tax Certificate.)

4. मागील 5 वर्षातील समान कामाकरीता किमान 1 नगरपरिषद / नगरपंचायत / महानगरपालिका किंवा अन्य प्राधिकरण येथे काम केल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र.

5. पॅनकार्ड

6. बयाना रक्कम भरणा केलेली पावती प्रत.

7. प्रोफेशनल टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र.

8. एजन्सीला दिवाळखोर किंवा काळ्या यादीमध्ये सामाविष्ठ/घोषित केलेले असु नये आणि निविदाकाराचे यापूर्वी कोणतेही काम कोणत्याही महानगरपालिकेने किंवा कोणत्याही नगरपरिषदेने समाधानकारक कामगिरी न केल्यामुळे रद्द केलेल नसावे. त्याकरीता रु.500/- च्या स्टॅम्प पेपर वर प्रतिज्ञापत्र निविदाधारकाला निविदे सोबत सादर करावे लागतील. निविदाकाराने कोणत्याही महानगरपालिका, नगरपरिषद किंवा केंद्र किंवा राज्य सरकारी एजन्सीने ब्लॅकलिस्ट न करणे, कामाची समाप्ती न करणे आणि अपात्रता / बंदी न केल्याबद्दल कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडील मुद्रांक पत्रावर या निविदेसोबत जोडलेल्या 'अ' परिशिष्टानुसार प्रतिज्ञापत्र सादर करावे.

9. निविदेमध्ये पदाधिकाऱ्याचा सहभाग नसलेबाबत रुपये 500/- च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र. (परिशिष्ट-ब)

10. निविदा दर समान पद्धतीने प्राप्त झाल्यास अंतिम निर्णय नगरपंचायतीचा राहील व पुढील नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

11. संस्थेवरती कोणत्याही स्वरुपाची गुन्हा नोंद दाखल नाही अथवा कोर्ट केस चालू नसलेबाबतची रुपये 500/- च्या स्टँप पेपरवरील स्वयंघोषणापत्र.

❖ **निविदेची अपात्रता :-**

खालील प्रमाणे किंवा या निविदेत दर्शविल्याप्रमाणे निविदेतील अटी व शर्ती तसेच निकष व पात्रतेची आवश्यकता पूर्ण करण्यास निविदा धारक अयशस्वी झाल्यास संबधित निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

1. या निविदेत विहित केलेल्या प्रक्रियेनुसार आणि नमुन्यांनुसार जर निविदा सादर केली नाही तर अशी निविदा ग्राह्य केल्या जाणार नाही.
2. या निविदेच्या वैध कालावधी मध्ये किंवा वाढविलेल्या कालावधीमध्ये निविदा धारकास आवश्यकता वाटल्यास भरण्यात आलेल्या कामाच्या दरा मध्ये वाढ केल्यास.
3. निविदा धारक स्वतःच्या अटीं व शर्तीसह पात्र होत नसल्यास.
4. निविदा अपूर्ण स्वरूपात भरल्यास.
5. निविदा भरण्याच्या अंतिम तारखेनंतर निविदा भरल्यास.
6. निविदेसोबत सर्व आवश्यक कागदपत्रे नसल्यास.
7. निविदेसोबत बयाना रक्कम भरल्याची पावती नसल्यास.

8. जर निविदाधारकाने केवळ एका कामाकरिता दर भरले असतील.

9. तांत्रिक प्रस्तावामध्ये सादर केलेली माहिती चुकीची किंवा खोटी, चुकून, नकळत किंवा कामाच्या कालावधी दरम्यान (काम कोणत्याही टप्प्यावर असले तरी) किंवा मुदतवाढीसह कामाच्या कालावधी दरम्यान कोणत्याही वेळी दोष आढळून आला तर

10. तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक प्रस्ताव एकत्रितपणे एकाच लिफाफ्या मध्ये सादर करणे.

11. निविदाधारकाने जर निविदा प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी बेकायदेशीर/भ्रष्ट/फसव्या मार्गाने निविदा मूल्यमापन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला तर.

12. कोणत्याही एका निविदाधारकाने अनेक प्रस्ताव सादर केल्यास किंवा दोन किंवा अधिक निविदाधारकामध्ये समान हितसंबंध अथवा समान दस्ताऐवज आढळल्यास,अतिरिक्त निविदाधारकास अपात्र ठरवले जातील.

13. निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेली कोणतीही निविदा देवगड जामसंडे नगरपंचायत उशीरा घोषित केली जाईल आणि ती नाकारली जाईल आणि देवगड जामसंडे नगरपंचायतच्या विवेकबुद्धीनुसार निविदाधारकाला न उघडता परत केली जाईल.

14. निविदा धारकांमार्फत प्राप्त निविदेचे मूल्यमापन करताना, काही निविदा धारकांनी कोणत्याही प्रकारे संगनमत करून किंवा एकत्रित येऊन निविदा प्रक्रियेमध्ये सामील झाले व ते देवगड जामसंडे नगरपंचायत आढळल्यास व ज्यामुळे प्रस्तावाच्या प्रक्रियेस विलंब होत असेल तर त्याकरिता त्यामध्ये अश्या सहभागी असलेल्या निविदा धारकांची जबाबदार असतील या निविदेकरिता तसेच देवगड जामसंडे नगरपंचायतद्वारे यांनतर काढलेल्या कोणत्याही निविदेत सहभागी होण्यापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी अशा निविदाधारकास अपात्र ठरविले जाईल.

15. तांत्रिक प्रस्तावामध्ये आर्थिक प्रस्तावामधील कोणत्याही बाबी जसे कि, कामाचे दर, दराबाबत धोरणा, अथवा आर्थिक पैलु बाबत इतर कोणतीही माहीती जर सामाविष्ठ करून प्रस्ताव सादर केला असेल तर निविदाधारकास अपात्र ठरविले जाईल.

❖ **निविदा उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया :-**

- **निविदा मुल्यांकंन समिती -**

  1. देवगड जामसंडे नगरपंचायतद्वारे स्थापन केलेली निविदा मुल्यांकंन समिती प्राप्त सर्व निविदेचे मूल्यमापन करेल.
  2. देवगड जामसंडे नगरपंचायतद्वारे स्थापन केलेली निविदा मुल्यांकंन समिती निविदेचे मूल्यमापन करताना शुल्क, EMD, पूर्व-पात्रता निकष, तांत्रिक प्रस्ताव (लिफाफा A) आणि व्यावसायिक प्रस्ताव (लिफाफा B) यांचे मुल्यांकंन करेल आणि त्यांची शिफारस मुख्याधिकारी देवगड जामसंडे नगरपंचायत यांना सादर करेल व त्यांचा निर्णय अंतिम असेल आणि निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

❖ **तांत्रीक प्रस्ताव मुल्यांकन (लिफाफा क्र. 1):-पात्रता निकष मधील कंपनी नोंदणी प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे सादर करणे.**

देवगड जामसंडे नगरपंचायतच्या संबंधित अधिकारी यांनी मागविले तर सर्व निविदा धारकांना पडताळणीसाठी निविदा उघडताना निविदेसोबत सादर केलेल्या दस्तऐवजांचे मूळ कागदपत्रे नगरपंचायतला सादर करावी लागतील.जे निविदाधारक त्यांची मूळ कागदपत्रे सादर करण्यास अयशस्वी ठरतील त्यांची निविदा नाकारण्यास ते स्वतः जबाबदार असतील. कोणत्याही निविदाधारकाने खोटी माहिती किंवा कागदपत्रे सादर केल्यास, अश्या निविदा धारकावर किंवा एजन्सीवर कायदेशीर कारवाई केली जाईल. सर्व प्रथम सर्वात तांत्रिकदृष्ट्या योग्य आणि नंतर आर्थिकदृष्ट्या फायदेशीर निविदांचे मूल्यांकन करून प्रतिसाद देणाऱ्या निविदांमधून योग्य निविदाधारकाची निवड केली जाईल. तांत्रिक निविदेमध्ये सहाय्यक कागदपत्रे आणि आवश्यक बयाणा रकमेसह रीतसर भरलेल्या निविदा मूल्यांकनाच्या स्वरूपाशी संबंधित सर्व कागदपत्रांचा समावेश असायला पाहिजे. निविदा दस्तऐवजांच्या मूल्यमापनाच्या आधारे, केवळ त्या निविदाधारकाचा ज्यांना संबंधित कामाचा अनुभव आहे, तांत्रिकदृष्ट्या पात्र आहेत, त्यांचा आर्थिक मूल्यमापनासाठी आणि निविदेतील नमूद कामाच्या अंमलबजावणीसाठी निवड करण्यासाठी विचार केला जाईल.

देवगड जामसंडे नगरपंचायत आपल्या विवेकबुद्धीनुसार, बोलीदारांकडून अतिरिक्त माहिती मागवू शकते. अशी माहिती विहित मुदतीत निवड केलेल्या निविदाधारकडून कालमर्यादेत पुरविली जाणे आवश्यक आहे, अन्यथा नगरपंचायत निविदाधारकाच्या एकूण जोखीम आणि खर्चावर स्वतःचे वाजवी गृहितक करेल आणि प्रस्ताव सदर निविदाधारकाची निविदा नाकारली जाऊ शकते. कोणत्याही निविदाधारकास नगरपरिषद मार्फत स्पष्टीकरण मागणे हे त्याने सादर केलेल्या निविदेची स्वीकृती मानले जाऊ शकत नाही. निविदा प्रक्रियेत सादर केलेल्या कोणत्याही माहितीची पडताळणी करण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे. केवळ तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकची आर्थिक प्रस्ताव (लिफाफा क्र.2) उघडल्या जातील आणि निवडलेल्या निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या जातील. तांत्रिक मूल्यमापनात कोणतेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी,देवगड जामसंडे नगरपंचायत यांनी राखून ठेवला आहे. आणि जर या निविदे प्रक्रियेला निविदाधारकांकडून कमी प्रतिसाद मिळाल्यास मा.मुख्याधिकारी आलेल्या सर्व निविदा आर्थिक प्रस्ताव मुल्याकंनासाठी उघडू शकतात.

उक्त निविदा संदर्भात निविदा पूर्व पात्रता अटी व शर्ती संबंधित संपूर्ण दस्ताऐवज व पात्रता निकष पूर्ण केलेल्या निविदा धारकांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येईल व ज्या निविदा मध्ये तांत्रिक पूर्व पात्रता व निकष अपूर्ण अथवा अपूर्ण दस्ताऐवज किंवा दस्ताऐवज जोडलेले नसतील अशा निविदा चे वित्तीय दर उघडण्यात येणार नाही.

❖ **आर्थिक प्रस्ताव (लिफाफा क्र. 2):-**

निविदा धारकाने निविदा सादर करतेवेळी आर्थिक प्रस्ताव (BOQ) कुठलेही चुकी न करता सादर करावीत. आर्थिक *प्रस्ताव (BOQ) निविदा प्रक्रियेमध्ये अपलोड केला जाईल. तांत्रिक आणि आर्थिक प्रस्तावाच्या दस्तऐवजांमध्ये* कोणतेही चुकीची माहिती, खोडतोड, अस्पष्ट शब्द अथवा इतर कोणतीच बाब ज्यामुळे तांत्रिक आणि आर्थिक प्रस्ताव स्पष्टपणे

समजण्यास अडचण होईल.पडताळणीसाठी कोणतीही किंवा सर्व मूळ कागदपत्रे मागण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी,देवगड जामसंडे नगरपंचायत यांनी राखून ठेवला आहे. खोटी किंवा गैरव्यवहार, बनावट कागदपत्रे किंवा माहिती निविदाकाराने सादर केल्याचे आढळल्यास, निविदाधारकावर कायदेशीर कारवाई केली जाईल.अशा निविदाधारकास/एजन्सीचा समावेश काळ्या यादी मध्ये केला जाईल. निविदाधारकांमार्फत सादर निविदेतील सर्व कागदपत्रांवर (सर्व पृष्ठे) निविदाकाराच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, निविदाकाराने निविदेच्या सर्व सूचना, मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्ती आणि निविदाधीन कामाचे काळजीपूर्वक वाचन व मुल्यांकन करणे अपेक्षित आहे. निविदेच्या आवश्यकतेनुसार सर्व आवश्यक माहिती प्रदान करण्यात अयशस्वी होणे किंवा निविदेच्या सर्व आवश्यकताची पूर्ती न करणारी निविदा सादर करणे हे निविदाकाराच्या स्वतःच्या जोखमीवर असेल आणि अशी निविदा जर नाकारण्यात आली तर त्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल. कोणत्याही निविदाधारकाला त्याने प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यात बदल करण्याची, बदलण्याची किंवा मागे घेण्याची परवानगी नाही. निविदाकारांनी त्यांचे प्रस्ताव ऑनलाइन निविदा दस्तऐवजांमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांच्या प्राप्तीच्या अंतिम तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करावेत.

- ❖ **आर्थिक प्रस्ताव मुल्यांकन (लिफाफा क्र. 2) :-**

निविदाधारकाची निवड हि तांत्रीक प्रस्ताव व गुणवत्ता आणि क्षमतेच्या आधारे केली जाईल. वित्तीय प्रस्तावामध्ये (BOQ) नमूद सर्व कामासंदर्भात सर्वात जास्त दर असलेची निविदा स्वीकारली जातील.

- ❖ **कोणतीही निविदा स्वीकारण्याचा आणि कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकारः-**

देवगड जामसंडे नगरपंचायतने कोणतेही कारण न देता आणि प्रभावित निविदाधारकांवर कोणतेही दायित्व न ठेवता कोणतीही/सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी देवगड जामसंडे नगरपंचायत यांनी राखून ठेवला आहे किंवा अशा निर्णयाच्या कारणास्तव प्रभावित निविदाधारकांना कळविण्याचे कोणतेही बंधन देवगड जामसंडे नगरपंचायतवर नाही. नगरपंचायत स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार आणि कोणत्याही वेळी तांत्रिक/आर्थिक प्रस्तावाच्या मुल्याकंनाच्या वेळी, कोणत्याही निविदाधारकास अपात्र ठरवू शकते.जर निविदाधारकाने सादर केलेल्या निविदामध्ये दिशाभूल करणारे किंवा खोटे दस्ताऐवज केले असेल किंवा अनिवार्य निकषांच्या समर्थनार्थ कागदपत्रे सादर केली असतील तर अशी निविदा रद्द करण्यात येईल.आवश्यकतेनुसार कोणतेही दस्तऐवज नसताना, संबंधित एजन्सी/निविदाधारक पात्र नाही असे मानले जाईल आणि अशा परिस्थितीत त्याची निविदा विचारात घेतली जाणार नाही.कोणत्याही निविदाधारकास संबंधित स्पष्टीकरण मागितल्यावंर ते सादर करण्यात अयशस्वी निविदाधारक तसेच दस्तऐवज सादर करण्यास करण्यास विलंब झाल्यास निविदा अवैध ठरेल.

निविदेचे मुल्यांकंन अथवा इतर निविदे सोबतची तुलना यासंबंधीची माहिती निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही निविदाधारकाला किंवा अधिकृतपणे अशा प्रक्रियेशी संबंधित नसलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला जाहीर केली जाणार नाही. तांत्रिक प्रस्ताव उघडण्याच्या तारखेदरम्यान प्रस्तावाची तपासणी/मूल्यांकन करण्यासाठी नगरपंचायतवर प्रभाव टाकण्यासाठी निविदाधारकाने केलेल्या कोणत्याही प्रयत्नामुळे अशा निविदाधारकाची निविदा नाकारली जाऊ शकते. निविदाधारकांमार्फत सादर तांत्रिक प्रस्तावामध्ये कोणतीही आर्थिक माहिती समाविष्ट नसावी. निविदाधारकांमार्फत सादर

आर्थिक माहिती असलेला प्रस्तावामध्ये जर तांत्रिक प्रस्तावाबाबत माहिती सादर केली असेल तर अशी निविदा सरसकट नाकारली जाईल.

अनिवार्य निकषांशी संबंधित नसलेले कोणतेही अनावश्यक दस्तऐवज अथवा इतर कोणतेही अनावश्यक दस्तऐवज निविदेसोबत सादर केले तर अशी निविदा नाकारण्यात येऊ शकतात. सर्व सहभागी निविदाधारकांना स्पष्टपणे असे निर्देश देण्यात येत आहेत की, केवळ तेच कागदपत्रे सादर करावी जी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या कामाच्या संबंधात अथवा अनिवार्य निकषांशी संबंधित आहेत या व्यतिरिक्त इतर कोणतेही आवश्यक कागदपत्रे निविदेसोबत सादर करू नयेत.

- निविदा स्विकारण्याबाबत अधिसूचना-निविदेचा कालावधी संपण्यापूर्वी, देवगड जामसंडे नगरपंचयत यशस्वी निविदाकाराला लिखित स्वरूपात पत्र देऊन सूचित करेल की त्याची निविदा यशस्वीपणे स्वीकारली गेली आहे.
- निविदाधीन अटींच्या पूर्ततेसाठी मुदत वाढवणे-निविदाधारक व देवगड जामसंडे नगरपंचायत परस्पर संमतीने निविदाधीन अटी पूर्ण करण्यासाठी वेळ वाढवू शकतात. निविदाधीन कामे करणे व इतर आवश्यक सर्व अटी व शर्ती करीत कामाचा कारनामा तयार करून सादर करावा लागेल. शंका टाळण्यासाठी, हे स्पष्ट केले जात आहे की अशा प्रकारची कोणतीही मुदतवाढ किंवा अटींची पूर्तता करण्यात विलंब झाल्यामुळे निविदाधारक दंडास पात्र असेल. निविदाधीन कामामध्ये निविदाधारकांमार्फत कोणतीही त्रुटी आढळल्यास निविदाधारकाने प्रथमतः ती त्रुटी दुरुस्त करावी किंवा त्याचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबत कडून कोणतेही अतिरिक्त शुल्क असणार नाही.
- निविदेच्या अटी व शर्तींशी सहमत न होणे-निविदेच्या अटी व शर्तींशी सहमत होण्यात जर निवडलेल्या यशस्वी निविदाधारकाने असहमती दाखविली तर, संबधित निविदा धारकाची बयाणा रक्कम व सुरक्षा रक्कम जप्त करणेत येवून पर्यायाने देवगड जामसंडे नगरपंचायत नवीन निविदा प्रक्रिया राबवू शकते.
- **सुरक्षाठेव रक्कम परत करणे:-** सुरक्षाठेव रक्कम काम पूर्ण होईपर्यंत राखून ठेवली जाईल व काम पूर्ण झाल्यास 6 महिन्यानंतर निविदा धारकाच्या मागणीनुसार अदा केली जाईल

**मुख्याधिकारी**

देवगड जामसंडे **नगरपंचायत**

**परिशिष्ठ-"अ"(Annexure-A)**

**प्रतिज्ञापत्र**

प्रति,

मा. मुख्याधिकारी,

देवगड जामसंडे नगरपंचायत

ता.देवगड जि. सिंधुदुर्ग.

महोदय,

विनंती पूर्वक प्रतिज्ञापत्र सादर करतो की, मी ______________________________ संचालक ______________________________ तर्फे कोणतेही नगरपरिषद/नगरपंचायत/महानगरपालिका करिता नगरपरिषद/ नगरपंचायत /महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता सर्व्हेक्षण, करमुल्याकंन, संगणकीकरणाच्या कंत्राटीधीन कामामध्ये आमचे कंपनी तर्फे करण्यात आलेल्या कामा बाबतीत आमच्या कंपनीला कोणत्याही नगरपरिषद/नगरपंचायत/महानगरपालिका द्वारे फसवेगिरी/ नुकसान/असमाधानकारक काम केल्या बद्दल काम केल्यामुळे अपात्र घोषित केलेले नसून फसवेगिरी/नुकसान/असमाधानकारक काम केले बद्दल दिलेले कंत्राट रद्द करून कामाबाबतचे आमचे देयक व सुरक्षा ठेव किंवा अनामत अनामत रक्कम जप्त केलेली नाही. तसेच कोणतेही नगरपरिषद/नगरपंचायत /महानगरपालिकेने आमच्या कंपनीचे नाव काळ्या यादी (Black List) मध्ये टाकलेले नाही.

करिता प्रतिज्ञालेख लिहीत आहे.

प्रतिज्ञार्थी :- ---------------------------------------------

वय :- ---------------------------------------------

व्यवसाय :- ---------------------------------------------

पत्ता :- ---------------------------------------------

दिनांक :- / /2026

स्थळ :- ---------------------------------------------

स्वाक्षरी :-

**सत्यापन**

मी वर दिलेली सत्य प्रतिज्ञापत्राची माहिती, निविदेत जोडलेले सर्व आवश्यक दस्ताऐवज व केलेले सर्व विधान माझे माहिती प्रमाणे संपूर्णपणे योग्य व सत्य असून,असत्य किंवा अयोग्य आढळल्यास मी व माझे कंपनी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

स्वाक्षरी :-

**परिशिष्ट – ब**

**प्रतिज्ञा पत्र**

*मी/ आम्ही याव्दारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे* कलम 16 (1) (आय) व कलम 44 (1) (ब) तरतुदीच्या, ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहीती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागेदारी नाही.

कलम 16 (1) आय :- यापुढे तरतुद केली असेल त्याव्यतिरीक्त, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामातकिंवा नरगपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही हिस्सा हितसंबंध असेल.

कलम 44 (1) (ब) :- पालिका संदस्य म्हणून किंवा नगरपालि केच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबातीत कलम 16 चे पोट कलम (3), खंड (अ), (ब),(क),(इ), व (ग), मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्षकिंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणतीही हिस्सा किंवा हितसंबंध असेल – मग अशा हिश्शायाची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत त्याचा अशीलच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तींच्यावतीने व्यावसायिकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नांव :- ----------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------

निविदा धारकाची सही

दिनांक :-

साक्षीदाराचे नांव :- ----------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------

साक्षीदाराची सही

दिनांक :-

| अ. क्र. | तपशिल | प्रति किलो प्रमाणे सादर करावयाचे दर |
|---|---|---|
| १ | लोखंडी पाईप (एका पाईपची लांबी -६ मी.व व्यास 273mm) | ……/- |
| २ | तांबे | ……/- |
| ३ | पितळ | ……/- |
| ४ | इतर भंगार (पंप,मोटर व ट्रान्सफॉर्मर इ.) | ……/- |

**गुन्हा नोंद नसलेबाबत स्वयंघोषणापत्र (रुपये ५००/- च्या स्टँपपेपरवर)**

**कामाचे नाव :-**

मी/आम्ही देवगड जामसंडे नगरपंचायत नगरपंचायती मार्फत प्रसिद्ध करणेत आलेल्या निविदे मधील वरील कामासाठी निविदा भारत असून सदर निविदे मधील अटी व शर्तीस अनुसरून मी अथवा माझे फर्मच्या नावे कोणत्याही प्रकारचा दिवाणी अथवा फौजदारी गुन्हा नोंद नाही. भविष्यात वरील प्रमाणे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे सिद्ध झालेस माझी निविदा गुन्हा नोंद नाही. भविष्यात वरील प्रमाणे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे सिद्ध झालेस माझी निविदा रद्द करण्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही :-

नाव :-

पूर्ण पत्ता :-

मोबाईल नंबर :-

ई-मेल असल्यास :-



Signature Not Verified
Digitally signed by Vivek Vishnu Khot
Date: 2026.05.15 14:38:43 IST
Location: Maharashtra-MH